सकाळ
शुक्रवार,
१५ फेब्रुवारी २०१९ ४

# पेठ येथे 'खेल मेनिया'चे आयोजन

**इस्लामपूर :** पेठ (ता. वाळवा) येथील नानासाहेब महाडिक अभियांत्रिकी महाविद्यालयात गुरुवारी (ता.२१) शिवाजी विद्यापीठाच्या अग्रणी महाविद्यालयांतर्गत 'खेल मेनिया २०१९'चे आयोजन करण्यात आले आहे. मुले व मुलींच्या बुद्धिबळ, बॅडमिंटन, मुलांच्या फुटबॉल स्पर्धा होतील. सांगली, कोल्हापूर जिल्ह्यांतील विविध अभियांत्रिकी महाविद्यालयांचे खेळाडू सहभागी होतील. उद्घाटन प्रसंगी राष्ट्रीय बुद्धिबळ प्रशिक्षक दीपक वायचळ, व्यंकटेश्वरा शिक्षण संस्थेचे सचिव राहुल महाडिक, कार्यकारी संचालक प्रा. महेश जोशी उपस्थित राहणार आहेत. स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शारीरिक व मानसिक क्षमता वाढवण्याबरोबर खेळांचे कौशल्य प्रदर्शन करण्याची संधी मिळेल असे राहुल महाडिक यांनी सांगितले. प्रा. संदीप पाटील, किरण पाटील, शुभम सकटे, धीरज सातपुते संयोजन करीत आहेत.